# Dr.Madhukarrao Wasnik PWS Arts and Commerce College Nagpur

# NATIONAL SERVICE SCHEME

# Annual Report 2020 – 2021

# Report on Regular Activity

### A Public Awarness Campaign about Covid-19 {From 1st Sept. to 4th Sept. 2020}

From the 1st of September to the 4th of september-2020, a useful 'Public Health Awarness Campaign' concerning the outbreak of Covid-19 was taken up by the NSS unit of the college in the nearby residential localties of Aawalebabu- Nagar, Siddharth Nagar and Shende Nagar. This constructive programme officers and 20 volunteer students of the college NSS unit.

These 20 voulnteers made door-to-door visits to 200 houses in these localities and distributed informative health-related brouchures to a number of families. During the unrelenting spread of Covid-19 infection, a very large number of people were undergoing severe psychological- repression and had got afflicted with troublesome mental disturbances. Some people were leading extremely stressful lives. Therefore to bring relief to their sufferings, Our NSS volunteers did an excellent job of providing strong mental support and psychological comfort to Several such people.

Putting up signboards -Marked with- precautionary measures and useful messages like-the use of masks, maintaining safe physical distance, taking care of hygiene and health, consulting the physician immediately with even the least primary symptoms of cough, cold or fever,-this Public Health Awareness Campaign was taken up for a continuous duration of one week.

It was with the meticulous planning- efforts of the Programme Officer, Dr.Sushant Chimankar, that this overall campaign beacme a reality with- commendable success. The Programme Officer, Dr.Kamlakar Tagade provided comprehensive guidelines to all our participating volunteers of NSS for the successful and smooth conduct of this campaign.

## Distribution of Kitchen-kits by NSS

**(20th Sept. 2020)**

During the period of lockdown, a number of families became disadvantaged and were passing through financial crises and consequent anxieties. Our members of the college 'teaching fraternity' had already given the necessary financial help to the NSS department. From the amount thus collected, the-articles of daily need and other required things were- distributed among the poor families residing in the adjoining areas of North Nagpur. Under this philanthropic initiative, kitchen-kits were also distributed among the

students of our college- especially those belonging to economically weaker sections of society by personally visiting their homes. At the same time, useful 'Ration-kits' were also given to the citizens living the neighboring areas of our college campus- namely shende Nagar, Manav Nagar and Aawale Nagar.

This service campaign was taken up for 4consecutive days. These kitchen -kits were provided to 40 different needy and poor familiarly apart from this active support ,some of our student volunteers also undertook the distribution work of food packets and eatables among the needy people hand-in-hand with some charitable institutions and groups- for a continuous duration of one month. Through the means of the support from -'Sankalp'- a well-known Social Service community, packaged food was being distributed in the areas of North Nagpur- both during the morning and evening hours for 2 months at a stretch. 20 NSS volunteers of our college team took special efforts to fulfil this task.

To guide and encourage us and to make the attempt succesfsful, the Secretary of 'People Welfare Society', Shri.Mohan Wasnik and the Joint Secretary, Shri. Manoj Wasnik - were with us all along the way. Pricipal, Dr. Yeshwant Patil inspired us with his unstinted support. The Programme Officers of NSS, Dr. Kamlakar Tagade and Dr. Sushant Chimankatr, our NSS volunteers- Ratnadeep Ganvir, Swapnil Dhande, Sagar Kohachade and Kunal Gupta were all those who- contributed their best to make this Endeavour successful.

## "My Family : My Responsibility''

**(2nd of October- 2020)**

The same draft (as it is) :Report NO:7 from the academic session- (2019-2020)

## Felicitation of NSS Voulnteers by Social Service-Institution- 'SEET'

**[15th October-2020]**

During the period of Covid-19 and the surrounding conditions which prevailed, support and help from the government was always available. Still the NSS unit of Dr.Madhukarrao Wasnik PWS Arts and Commerce College did an excellent job by joining hands and working in a spirit of cooperation with an NGO named 'SEET' (Social Education, Environment, Trust) and provided services to affected people on its own . Taking timely note of their contribution and work, the NSS volunteers were felicitated by the NGO- 'SEET'. On this occasion, senior police Inspector of Kapil Nagar Police station, Shri. Jadhav; the President of SEET, Dr. Siddiqui and the Joint Secretary of 'People Welfare Society' Shri. Manoj Wasnik was present to encourage our student volunteers. Our college comes within the administrative jurisdiction of the nearby Kapil Nagar Police Station (zone).

## Financial Help / Support to the Needy - During the 'Covid' Period'

**(27th November-2020)**

During the 'Covid' period, a fairly large number of families got ruined and completely shattered. A majority of people lost their work, jobs and means of livelihood. Under these conditions funds and financial help were obtained through the positive efforts of the college NSS Department (Unit) so as to provide support to the 'Part-Time' employees of the college. This amount of money was distributed among the needy to support them during the destabilizing times of covid. Among the dignitaries - prominently present on this occasion were : the Principal of the college, Dr.Yeshwant Patil; The Vice-Principal, Dr. Narendra Bagde; Dr. Pradnya Bagde, Dr. Suresh Bhagwat, Dr. Sudesh Bhowate; the Programme Officer of NSS, Dr. Sushant Chimankar, Co- Programme Officer (NSS), Dr. Kamlakar Tagade; Dr. Vimal Rathod and Dr.Pratibha Pakhidde.

## ''Aids - Awareness - 'Public Awareness' Rally''

**(1st December-2020)**

On the occasion of 'World Aids Day', Dr. Madhukarrao Wasnik PWS Arts, Commerce and Science College and NSS team of the college jointly took up different informative 'Public Awareness' activities. On Wednesday, an 'awareness' rally was taken out from the college campus. this rally commenced from the college ground and further went through the nearby localities of Shende Nagar, Samyak Nagar, Aawale Nagar and Ramai Nagar (given) useful - 'awarness' messages to people. The rally concluded with - a small assembly at Teak Naka (square) by guiding people about how to protect and prevent themselves from (catching) the sickness of AIDS. The rally witnessed the participation of 60 students from our college. [A total of 60 students from our college took part in this rally.)

A 'street play' performance was given by this year, NSS team on this day. The Department of Health has decided upon the aim of 'know your status.' Therefore, an appeal was made to citizens at large to take up the 'HIV Analysis Test'. Proper awareness programmes in this respect are being regularly undertaken by the Health Department of the state. As a result, the serious proportions of this disease have come down-considerably. Detailed information regarding many such beneficial initiatives was given to the citizens of these areas.

On this occasion, a large number of college students and people from residential colonies were present to take advantage of the awareness rally. Also present with the citizens were the Programme Officer of NSS, Dr. Sushant Chimankar and the Co-Programme Officer of NSS, Dr. Sushant Chimankar and the Co-Programme Officer, Dr. Kamlakar Tagde.

## ''Youth Day''

**[12th January- 2021]**

Since the year 1984, the Government of India has declared 12th January of every year to be celebrated as the 'National Youth Day'- the birthday of Swami Vivekanand- with the pious and noble objective of motivating the youth power of the country.

The 12th of January is celebrated as the ' international youth day ‘throughout the country. With a view to honor this importance of the day, every year, regular thought-provoking deliberative sessions on different facets-related to the youth are encouraged with the conduct of -activities and relevant programmers. our nation, India is known the world over as the country of the youth more than half of the scene, the total population of our country is that of young people. From 'playground to boll wood', the youth dominate almost every- worthwhile field of activity. They are moving ahead even in the territory of Indian politics- and have been contributing richly through their work in all major areas of any importance. The Prime Minister, Shri. Narendra Modi has firmly established the Central Government of Indian Republic by intelligently (wisely) integrating this youth power. Be it fashion trends or changing life styles- everywhere the young generation has a powerful -through his speech meaning presence. These were some of the thoughts expressed by the Head of the Deptt. of History, Dr. Chandrashekhar Patil. Dr. Manohar Yerkalwar from the Deptt. of Sociology -was especially present on this occasion. As the chairperson of this function, Dr.Sushant Chimankar, the Programme Officer of NSS was at the help of affairs to guide our students. The Co-Programme officer of NSS, Dr. Kamlakar Tagde took charge of conduction the overall proceedings of this Programmed.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर

राष्ट्रीय सेवा योजना

डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर

कार्यक्रमाचा अहवाल

शैक्षणिक सत्र २०२० – २०२१

प्रा. डॉ. सुशांत चिमणकर
रासेयो कार्यक्रम अधिकारी

डॉ . यशवंत व्ही. पाटील
प्राचार्य

## कवठा या दत्तक गावी मास्क व सनीटायझर चे वितरण

**दिनांक २६ जुले २०२०**

महाराष्ट्राचे शिल्पकार व आरक्षणाचे जनक छत्रपती शाहूजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने दिनांक २६ जुले २०२० महाविद्यालयाच्या रासेयो विभागाद्वारे दत्तक घेतलेल्या कवठा या गावी मास्क व सनीटायझर चे वितरण करण्यात आले. सोबतच आरोग्य स्वच्छता व कोविडच्या टेस्ट बद्दल नागरिकामध्ये असलेला भ्रम दूर करण्यात आला.

कवठा हे ग्राम कामठी तहसील भागात येत असून महाविद्यालयाने हे गाव दत्तक घेतले आहे. गेल्या ५ वर्षापासून या गावी राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे शिबिराचे आयोजन केले जाते. सोबतच दर महिन्यातून एकदा रासेयो स्वयंसेवकाना घेऊन रासेयोचे कार्यक्रम अधिकारी भेट देत असतात.

कोविडच्या प्रादुर्भाव वाढत असतांना या गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे छत्रपती शाहूजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने एक दिवशीय शिबीर आयोजित करून आजारी असल्यास कोविडची तपासणी करण्यासाठी गावातील नागरिकांना प्रवृत्त करण्यात आले. तसेच आरोग्याबाबत जनजागृती करण्यात आली. शासनाद्वारे घालून दिलेल्या नियमांचे पालन करा. हाथ सतत स्वच्छ धुवा, शारीरिक अंतर ठेवून कोणतेही काम करा. स्वच्छताचे पालन करा. अशा प्रकारचे मार्गदर्शन करण्यात आले. सोबतच २०० मास्कचे व १०० सनीटायझर चे वितरण करण्यात आले.

याप्रसंगी कवठा ग्रामपंचायत चे सरपंच, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, आशा वर्कर, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. कमलाकर तागडे, डॉ. सुशांत चिमणकर, डॉ. मेघा रामटेके, सागर कोहचडे, अंकित राहागंडाले इत्यादी स्वयंसेवक उपस्थित होते.

# **कोविड योद्धाचा सत्कार**

**दि. १५ आगस्त २०२०**

महाराष्ट्र राज्यात दिवसेंदिवस करोनाची रुग्ण संख्या वाढत असतांना सरकार सुद्धा त्याला धैर्याने तोंड देत आहेत. पोलीस प्रशासन सुद्धा अनेक पातळयावर काम करीत आहे. पोलीस सेवेत अपुरे मनुष्यबळ असल्याने महाराष्ट्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या आदेशानुसार डॉ.मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस कला व वाणिज्य महाविद्यालयातील ३ प्राध्यापक व ५ रासेयोच्या स्वयंसेवकांची स्थानिक कपिल नगर पोलीस स्टेशन अंतर्गत ‘कोविड योद्धा’ म्हणून निवड करण्यात आली होती. एकूण जवळपास टाळेबंदीच्या काळात २ महिने या कोविड योद्धानी पोलीस बंधू बरोबर रात्र-दिवस काम केले.

कपिलनगर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या वस्तामध्ये बंदोबस्त व सुव्यवस्था ठेवण्यासह इतर जिल्हा व राज्यात जाणाऱ्या वाहतुकीवर नियत्रण ठेवून त्याची इतभूत माहिती शासन दरबारी देण्याचे काम या कोविड योद्धानी केले. त्यांच्या कामाची दखल शासनाने घेत सर्व पोलीस स्टेशनला कोविड योद्धाचा सत्कार करण्याचे आदेश दिले. त्याची अमलबजावणी महाविद्यालयाने करत **१५ आगस्ट २०२० ला स्वातंत्र्य दिनी** कोविड योद्धा म्हणनू रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुशांत चिमणकर, डॉ. नागसेन लांडगे, डॉ. लखन इंगळे, प्रा. रवी जनबंधू, स्वप्नील धांडे, सागर कोहचडे, अभिषेक पाटील इत्यादी रासेयोच्या स्वयंसेवकाचा सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे सचिव श्री. मोहन वासनिक, श्री. मनोज वासनिक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील, उप प्राचार्य डॉ. नरेद्र बागडे, व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**कोविड १९ बाबत जनजागरण अभियान**

**दि. १ सप्टेंबर ते ४ सप्टेबर २०२०**

महाविद्यालययातील रासेयो विभागाच्यावतीने स्थानिक आवळेबाबूनगर, सिद्धार्थ नगर, शेंडे नगर  या वस्तीतील रहिवासी लोकांना कोविड १९ च्या संदर्भात जन जागृती अभियान दिनांक **१ सप्टेंबर ते ४ सप्टेबर २०२०** या दरम्यान राबविण्यात आले होते. सदर कार्यक्रम २० रासेयो स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात आला.

२० रासेयोच्या स्वयंसेवकानी आवळेबाबू नगर, सिद्धार्थ नगर व शेंडे नगर या वस्तीत जाऊन २०० घरी भेटी देऊन आरोग्य विषयक माहिती पत्रक वाटले. कोविड १९ च्या प्रदुर्भावात अधिक लोकांचे मानसिक खच्चीकरण झाले होते, काही व्यक्ती तणावात जगत होते. त्यामुळे त्यांना मानसिक आधार देण्याचे महत्वाचे काम रासेयो च्या स्वयंसेवकानी केले.

मास्कचा वापर करा, शारीरिक अंतर ठेवा, आरोग्याची काळजी घ्या, सर्दी, खोकला व ताप दिसताच डॉक्टरांकडे जा. अशा प्रकारचे फलक घेऊन जनजागृती अभियान एक साप्ताह राबविण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. सुशांत चिमणकर यांनी केले होते. या अभियानासाठी रासेयोच्या स्वयंसेवकाना डॉ. कमलाकर तागडे यांनी मार्गदर्शन केले.

## रासेयो तर्फे किचन कीट वितरण कार्यक्रम

**दि. २० सप्टे. २०२०**

टाळेबंदीच्या कालावधीत अनेक परिवार हतबल व आर्थिक विवेचनात सापडले होते. महाविद्यालयातील प्राध्यापकवृंदानी रासेयो विभागाला आर्थिक स्वरुपात मदत केली होती. त्यामधून दैनंदिन जीवनाकरिता लागणाऱ्या वस्तूचे उत्तर नागपूर परिसरातील गोर-गरीब परिवाराला किचन कीट चे वितरण करण्यात आले. या मध्ये आमच्या महाविद्यालयातील आर्थिक दुर्लब घटकातील विद्यार्थ्याच्या घरी जाऊन त्यांना सुद्धा किचन कीटच्या साहित्याचे वाटप केले गेले. महाविद्यालयच्या लगतच्या परिसरातील शेंडे नगर, मानव नगर व आवळे नगर येथील नागरिकांना रेशन कीट वाटण्यात आल्या.

एकूण चार दिवस हा उपक्रम राबविला गेला. यामध्ये ४० परिवाराला किचन कीटचे वितरण करण्यात आले होते. त्यासोबतच काही स्वयंसेवकानी काही सेवाभावी संस्थासोबत भोजन वितरणाचा कार्यक्रम सतत एक महिना राबविला. संकल्प या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून उत्तर नागपूर मध्ये २ महिने सकाळ आणि रात्रीचे भोजन बंद डब्याटत वितरीत करण्यात येत होते. त्यामध्ये एकूण २० स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

यासाठी पी.डब्ल्यू.एस संस्थेचे सचिव श्री. मोहन वासनिक, सहसचिव श्री. मनोज वासनिक, महाविद्याल्याचे प्राचार्य डॉ.यशवंत पाटील, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. कमलाकर तागडे, डॉ. सुशांत चिमणकर, रत्नदीप गणवीर, स्वप्नील धांडे, सागर कोहचडे, कुणाल गुप्ता इत्यादी स्वयंसेवकानी उत्कृष्ट कामगिरी बजावली.

## माझे कुटुंब माझी जबाबदारी

**दिनांक – ०२ आक्टोबर २०२०**

महाराष्ट्र शासनाने कोविड १९ च्या अंतर्गत लावलेली बंधने हळूहळू बाजूला करीत दैनदिन जीवनमान सुरु करतांना 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' या अंर्तगत एक मोहीम राबविण्यात येत आहे. कोविड १९ चा प्रादुर्भावाने संपूर्ण विश्व होरपळून निघाले आहे. अशातच अनेक लोकांना प्राणास मुकावे लागले. त्याचा फटका समाजघटकांना सुद्धा बसलेला आहे. हा आजार संसर्गजन्य असल्यामुळे एकाचा आजार अनेकांना होत आहे. त्यासाठी सद्या औषध उपलब्ध नाही अशा परिस्थितीत जो पर्यंत औषध उपलब्ध होत नाही तो पर्यंत आपले दैनदिन व्यवहार व कार्यक्रम सुरक्षित अंतर ठेवून करायचे अशा प्रकारचे आदेश शासनाने काढले. त्या आदेशाची अमलबजावणी व्यवस्थित करण्यासाठी आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे **महात्मा गांधीजी यांच्या जयंतीनिमित्त दिनांक – ०२ आक्टोबर २०२० रोजी** महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना 'माझे कुंटूब माझी जबाबदारी' या अंतर्गत माहिती देण्यात आली. आणि ती माहिती आपल्या शेजारी व इतर सुद्धा सांगावी यासाठी त्यांना सूचना देण्यात आल्या.

सदर कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या सिद्धार्थ सभागृहात शासनाच्या नियमानुसार डॉ. सुशांत चिमणकर, डॉ. कमलाकर तागडे यांनी केले. सदर कार्यकर्माचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील होते, या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजनासाठी प्रा. अमृता मासुरकर, डॉ. विमल राठोड व रासेयोच्या स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

**सीट या समाजिक संस्थेद्वारे रासेयो स्वयंसेवकांचा सत्कार**

**दि. १५ आक्टो. २०२०**

कोविड -१९ च्या कालावधीत शासकीय मदत तर मिळतच होती. परंतु डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या चमूने सीट (Social, Education, Environment Trust) या NGO संस्थेसोबत सतत उत्कृष्ट कार्य केले. रासेयोच्या स्वयंसेवकानी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांचा सत्कार सीट संस्थेद्वारे करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालय ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत येते, त्या कपिलनगर पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.जाधव साहेब, सीट चे अध्यक्ष डॉ. सिद्दिकी व पी.डब्ल्यू.एस चे सहसचिव नमोज वासनिक उपस्थित होते.

**कोविड मध्ये गरजूंना आर्थिक मदत**

**दि. २७ नोव्हेंबर २०२०**

कोविड – १९ मध्ये अनेकांचे संसार उध्वस्त झाले, अनेकांच्या हातचे काम गेले. बहुतांश लोक बेरोजगार झाले होते. अशातच महाविद्यालयातील अंशकालीन कर्मचाऱ्यांना कोविड कालावधीत आर्थिक मदत म्हणून रासेयोच्या माध्यमातून आर्थिक सहायता राशी गोळा केली गेली. त्या राशीचे वितरण गरजू लोकांना करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील, उपप्राचार्य डॉ.नरेंद्र बागडे, डॉ. प्रज्ञा बागडे, डॉ. सुरेश भागवत, डॉ. सुदेश भोवते रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सुशांत चिमणकर, सहकार्यक्रम अधिकारी डॉ. कमलाकर तागडे, डॉ. विमल राठोड, डॉ. प्रतिभा पखीडे उपस्थित होते.

# एड्स जनजागृती रॅली

**दिनांक – १ डिसेंबर २०२०**

जागतिक एड्स दिनानिमित्त डॉ.मधुकरराव वासनिक पी .डब्ल्यू.एस कला ,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय आणि राष्ट्रीय सेवा योजना यांचा संयुक्त विध्यामाने विविध जनजागृतीपर उपक्रम आयोजित करण्यात आले. बुधवारी महाविद्यालयतून जनजागृती रॅली काढण्यात आली. महाविद्यालच्या प्रागनातून रॅलीस सुरुवात करण्यात आली आणि शेंडे नगर, सम्यक नगर, आवळे नगर, रमाईनगर या क्षेत्रातून जाऊन रॅलीच्या माध्यमातून जनजागृती संदेश देण्यात आले सोबतच रॅलीचा शेवट टेका नाका येथे छोटे खाणी सभा घेऊन एड्स पासून कसा बचाव करण्यात येईल या वर मार्गदर्शन करण्यात आले आणि रॅलीचा समापन झाले. या रॅलीत एकूण ६० महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभागी झाले होते.

राष्ट्रीय सेवा योजना तर्फे, पथनाट्य सादर करण्यात आले. यावर्षी आरोग्य विभागाने 'नो युवर स्टेटस' ध्येय निश्चित केले आहे. त्यामुळे नागरिकांनी एचआयव्ही तपासणी करावी, असे आवाहन करण्यात येणार आले. या आजाराबाबत आरोग्य विभागाकडून सातत्याने जनजागृती करण्यात येत आहे. त्यामुळे या आजाराचे प्रमाण कमी झाले आहे. अश्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजना चे कार्यक्रम अधिकारी डॉ.सुशांत चिमणकर, राष्ट्रीय सेवा योजना चे सहकार्यक्रम अधिकारी डॉ.कमलाकर तागडे, विद्यार्थी आणि वस्तीतील नागरिक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युवा दिन

**दि. १२ जानेवारी २०२१**

स्वामी विवेकानंद यांच्या वाढदिवसा दिनी देशातील तरुणांना त्यांच्या विचारांनी प्रोत्साहित करण्यासाठी भारत सरकारने १९८४ पासून दरवर्षी १२ जानेवारी हा दिवस 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून घोषित केला आहे.

देशाभरात १२ आगस्त हा दिवस 'आंतरराष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा केला जातो. दरवर्षी यानिमित्याने युवकांशी निगडीत विविध पैलूवर चर्चा घडवून आणली जाते. आपला भारत देश हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. देशातील निम्म्याह्यून अधिक लोकसंख्या तरुणांची आहे. खेळापासून बॉलिवूडपर्यंत सगळ्याच क्षेत्र तरुणांचा वर्चस्व आहे. भारतीय राजकारणातही तरुण पुढे येत आहेत. तरून प्रत्येक क्षेत्रात चांगले काम करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तरुणांच्या शक्तीला एकवटून आपले सरकार स्थापना केले आहे. तरुण मंडळी करतात. फशन ट्रेंड असो की बदलती जीवनशैली या सगळ्यातच तरुण पिढीचे वर्चस्व आहे. असे उद्दगार याप्रसंगी इतिहास विभाग प्रमुख डॉ. चंद्रशेखर पाटील यांनी काढले. या प्रसंगी डॉ. मनोहर येरकलवार उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रासेयो चे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुशांत चिमणकर होते. कार्यक्रमाचे संचालन रासेयोचे सहकार्यक्रम डॉ. कमलाकर तागडे यांनी केले.

## पोलियो लसीकरण जनजागृती मोहीम

**दि. १७ जानेवारी २०२१**

राष्ट्रीय लसीकरण दिवस पल्स पोलिओ लसीकरण या नावे चालवला जातो. राष्ट्रीय पोलिओ लसीकरण (Pulse Polio Immunisation Drive) मोहिमेला ३१ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे. या अंतर्गत पाच वर्षांपर्यंतच्या सर्व लहान मुलांना पोलिओ लस देण्यात येणार आहे. दरम्यान, राष्ट्रीय लसीकरण दिवसाची सुरुवात १७ जानेवारीपासून होणार होती. मात्र १६ जानेवारीपासून कोविड-19 लसीकरण (Covid-19 Vaccination Drive) अभियान सुरु झाल्याने पोलिओ लसीकरण मोहिमेला स्थगिती देण्यात आली. परंतु शासनाच्या निर्देशानुसार जनजागृतीपर रली चे आयोजन महाविद्यालयातील रासेयो द्वारे केले गेले.

भारताच्या राष्ट्रपती कार्यालयाशी सल्लामसलत करून आरोग्य मंत्रालयाने पोलिओ लसीकरण दिन 31 जानेवारीपासून सुरु करण्याचा निर्णय घेतला. हा दिवस राष्ट्रीय लसीकरण दिवस किंवा पोलिओ संडे म्हणून देखील ओळखला जातो.

महाविद्यालयातील रासेयोच्या चमूने परिसरातील भागात पोलियो जनजागृती रली काढून पोलियो मुक्त भारतचा संदेश दिला. याप्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. सुशांत चिमणकर, सहकार्यक्रम अधिकारी डॉ. कमलाकर तागडे, डॉ. विमल राठोड, डॉ. अमृता मासुरकर आणि ३२ रासेयोचे स्वयंसेवक उपस्थित होते.

## भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**दि. २३ जानेवारी २०२१**

पीपल्स वेलफेयर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. मधुकरराव वासनिक यांच्या ८९ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने **२३ जानेवारी २०२१** ला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे महाविद्यालयाच्या ‘सिद्धार्थ सभागृहात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचारी वर्गाने रक्तदान केलेते. या करिता इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथील रक्तपेढी विभागाची चमू च्या सहकार्याने रक्तदान शिबीर पार पडले. एकूण (प्राध्यापक ९ आणि विद्यार्थी ३१) ४० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

# राष्ट्रीय मतदार दिवस

**दि. २५ जानेवारी २०२१**

स्थानिक डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस कला व वाणिज्य महाविद्यालय नागपूर येथे **२५ जानेवारी २०२१ राष्ट्रीय मतदार दिवस** साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी भारतीय संविधानाच्या माध्यमातून सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार दिला आहे. एक व्यक्ती एक मत या मूल्याचे पालन करणे सर्व भारतीयाचे आद्य कर्तव्य आहे. अठरा वर्ष पूर्ण झालेल्या सर्व तरुणांनी स्वयंपूर्तीने मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी पुढाकार घ्यावा. आजचे तरूण हे उद्याच्या भारताचे भविष्य घडविण्यासाठीचे भागीदार आहेत. त्यामुळे या तरुणाच्या हातात लोकशाहीला बळकट करण्यासाठी राष्ट्रीय मतदार दिवस उत्सव म्हणून साजरा होणे गरजेचे आहे, असे वक्तव्य विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. यशवंत पाटील यांनी व्यक्त केले. सुरवातीला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मार्फत **'राष्ट्रीय मतदार दिवस'** जनजागृतीपर रैली काढण्यात आली व विद्यार्थ्यासाठी चित्रकला व स्लोगन स्पर्धा आयोजित करण्यात आली. याप्रसंगी वस्तीतील नवोदित मतदारांना मतदार ओळखपत्राचे वाटप उपप्राचार्य डॉ. नरेंद्र बागडे यांच्या हस्ते करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे डॉ. सुशांत चिमणकर, डॉ. कमलाकर तागडे, डॉ. विमल राठोड, डॉ. अमृता मासुरकर, प्रा. रमेश येले (बिलओ), प्रा. किशोर शेंडे (बिलओ), कैलाश राठोड (बिलओ), मंदा लोखंडे (बिलओ) व रासेयोचे स्वयंसेवक उपस्थित होते.

# नशा मुक्ती भारत अभियान

**दि. २८ जानेवारी २०२१**

महाराष्ट्र शासनाच्या विभागा अंतर्गत सामाजिक न्याय व समाजकल्याण विभाग कार्यरत आहे. त्याच अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्था यांच्या वतीने विद्यार्थ्याकरिता एक अभिनव उपक्रम राबविला गेला. या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्याकरिता एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली. सदर कार्यशाळा सामाजिक न्याय भवन नागपूर येथे दि. २८ जानेवारी २०२१ रोजी संपन्न झाली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना नशा मुक्त भारत घडविण्याची शपथ देण्यात आली. विद्यार्थी हा समाजाचा नागरिक असल्याने पुढची पिढी योग्य सुसंस्कारित घडावी हा यामागचा उद्देश ठेवून कार्यक्रम घेण्यात आला होता. महाविद्यालयातून रासेयोच्या एकूण १० विद्यार्थ्याची निवड सदर कार्यशाळेकरिता केली होती. सदर कार्यशाळेला बार्टीचे संचालक डॉ. धम्मकीर्ती गजभिये, सामाजिक न्याय विभागाचे उपायुक्त डॉ. गायकवाड उपस्थित होते.

**कोविड योद्धा म्हणून केंद्रीय नेतृत्वाकडून सत्कार**

**दि. ३० जानेवारी २०२१**

देशातील कोविडच्या परिस्थितीत अनेक शासकीय निमशासकीय स्वयंसेवी संस्थांनी आपापल्या परीने सेवाभावी वृत्तीने कार्य केले. यामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग सुद्धा अग्रेसर होता. डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेची चमू रात्र-दिवस कोविडच्या दरम्यान सेवा देण्याचे कार्य करीत होती. महाविद्यालयाच्या हद्दीत येणाऱ्या पोलीस स्टेशनमध्ये रासेयोची चमू सहकार्य करीत होती. दुसरी कडे काही एन. जी. ओ सोबत किचन कीट आणि भोजन वितरण करण्याच्या कामात मदत करीत होते. या संपूर्ण कामाची धुरा रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुशांत चिमणकर यांनी योग्य रित्या सांभाळली होती. त्याच्या कार्याचा सन्मान हा केंद्रीय परिवहन, भूपृष्ठ मंत्री नितीनजी गडकरी यांच्या हस्ते करण्यात आला होता.

## लसीकरण जनजागृती मोहीम व मदत केंद्र

**दि. १० फेब्रुवारी ते ३० फेब्रुवारी २०२१**

कोविड कालवधीत लसीकरणाच्या पहिल्या फेरीत लोक लसीकरण करून घेण्यास घाबरत होती. लसीकरण घेतल्याने भविष्यात वाईट दुष्परिणाम होणार या भीतीमुळे लस घेण्यास कोणीही तयार होत नव्हते. त्यामुळे आमच्या महाविद्यालयातील रासेयोच्या चमूने लोकांच्या मनातील भीती दूर सारण्यासाठी लसीकरण जनजागृती मोहीम उघडण्यात आली होती. नागरिकांच्या कोविड लसीकरनाच्या संदर्भात जो भ्रम निर्माण झाला होता. तो रासेयोच्या स्वयंसेवकानी दूर केला. लसीकरणाच्या या मोहिमेने लवकरच जोर पकडला. अपंग, वृद्ध यांना स्वतच्या वाहनावर रासेयो चे स्वयंसेवक लसीकरण केंद्रावर घेऊन परत त्यांच्या घरी सोडून देण्याचे काम दि. १० फेब्रुवारी ते ३० फेब्रुवारी २०२१ या दरम्यान केले आहे. यादरम्यान रासेयोच्या स्वयंसेवकानी एकूण १८३ वृद्ध, अपंग लोकांना लसीकरण केंद्रावर घेऊन जाऊन लसीकरण करण्यास मदत केली. त्याची दखल महाराष्ट्र टाइम्स ने घेतली होती.

## कोविड चाचणी तपासणी शिबीर

**दि. २५ फेब्रुवारी २०२१**

महाविद्यालयाच्या सभोवतालच्या परिसरातील वाढती कोविडची रुग्णसंख्या बघता महाविद्यालयात रासेयो युनिट तर्फे कोविड चाचणी तपासणी शिबिराचे आयोजन दि. २५ फेब्रुवारी २०२१ रोजी महाविद्यालयाच्या सिद्धार्थ सभागृहात केले होते. सदर शिबिरात परिसरातील लोकांना तपासणी करून घेण्यासाठी रासेयो स्वयंसेवक स्वत: पुढाकार घेत होते. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने या शिबिरांचे आयोजन केले होते. या शिबिराकरिता नागपूर महानगर पालिका नागपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र शेंडे नगर येथील वैद्यकीय चमूने अतिशय उत्तम कार्य केले. दिवसभरात एकूण ११८ नागरिकांनी कोविडची तपासणीचा लाभ घेतला होता.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

**दि. १४ एप्रिल २०२१**

भारत देशाचे संविधान निर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण केले गेले. त्यासोबतच 'भीम गीत' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. महाविद्यालयातील रासेयोच्या स्वयंसेवकानी सदर कार्यक्रम बहारदार रीतीने घडवून आणला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील होते. त्यासोबतच उप प्राचार्य डॉ. नरेंद्र बागडे, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुशांत चिमणकर, डॉ. कमलाकर तागडे, डॉ. विमल राठोड, डॉ. अमृता मासूरकर आणि महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## दहशतवाद विरोधी दिन

**दि. २१ मे २०२१**

**२१ मे** या दिवशी भारताचे माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांची पुण्यतिथी साजरी केली जाते. हाच दिवस दहशतवाद विरोधी दिवस म्हणून संपूर्ण देशात पाळला जातो. दहशतवादापासून आज जगातील कोणताही देश सुरक्षित राहिलेला नाही. त्यामुळे हा प्रश्न कोणत्याही एका देशाचा नसून, या दहशतवादाने सर्व जगात आपली पावल पसरलेली आहेत. त्यामुळे जागतिक शांतताच धोक्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या समान्य विभागाने दिलेल्या निर्देशानुसार दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा महाविद्यालयात दहशतवाद व हिंसाचार दिवस साजरा केला गेला. या प्रसंगी आभासी पद्धतीने या कार्यक्रमात दहशतवाद व हिंसाचार या विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. श्रीकांत भोवते, कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय रामटेक यांना आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील होते.

डॉ. भोवते यांनी आपल्या चित्रफितीच्या माध्यमातून, दहशतवाद्यांच्या हल्ल्यामुळे फार मोठया प्रमाणावर झालेल्या जीवितहानीचे वार्षिक आकडेवारी सांगितली. विविध देशातील दहशतवादाचे प्रकार त्यासोबतच इतर प्रकारची विस्तृत माहिती दिली.

सदर कार्यक्रम झूम अप्लिकेशनच्या माध्यमातून घेण्यात आला होता. याप्रसंगी महाविद्यालयातील एकूण (प्राध्यापक १९ – विद्यार्थी – ४४) ६३ प्राध्यापक व विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुशांत चिमणकर यांनी केले तर आभार डॉ. विमल राठोड यांनी मानले.

# योग दिन

**दि. २१ जून २०२१**

केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या परिपत्रकानुसार आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या निर्देशानुसार कोविडच्या प्रादुर्भावामुळे योग दिन आभासी पद्धतीने महाविद्यालयाच्या सभागृहात मोजक्या प्राध्यापकाच्या उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी शारीरिक शिक्षण विभागाचे डॉ. सौरभ मोहोड यांनी योग प्रात्यक्षिक करून दाखविले त्या प्रमाणे इतरांनी घरी बसून ती प्रात्याक्षिके केली. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील, शारीरिक शिक्षण विभागाचे प्रा. आत्माराम पांडे, ग्रंथपाल सिद्धार्थ वाणी, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुशांत चिमणकर, सह कार्यक्रम अधिकार डॉ. कमलाकर तागडे इत्यादी उपस्थित होते.